# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 21/09/2023 (गुरूवार) दुपार

---

### चोरी

**पो.स्टे. काटोल** :— अंतर्गत काटोल बस स्टॉप येथे दिनांक २०/०९/२०२३ चे ११.३० वा. ते १४.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— सौ. आशा गंगाधर अवजेकर, वय ६५ वर्ष रा. मौर्शी अमरावती हे मौर्शी वरून वरूड बसने काटोल येथे आले असता काटोल बस स्टॉप येथे भुक लागल्याने खाण्यासाठी पॅकेट घेतले व पैसे दीले पैशाचे पॅकेट बॅगेत ठेवले व सावनेर जाणाऱ्या बस मध्ये बसायला गेले तेव्हा बॅगेत पाहले तेव्हा पैशाचे पॅकेट दिसले नाही त्यामध्ये सोन्याचे चार ग्रॅमचे गोल मणी १६०००/—रू. सोन्याचे चार ग्रॅम पेंडॉल १६०००/—रू चांदीचे जोडवे ७००/— रू व नगदी १००००/—रू असे एकुण ४२७००/— रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात व्यक्तीने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक खोब्रागडे मो. क्र. ८३०८०८२०९४ या करीत आहे.

### पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पो.स्टे. काटोल** :— दिनांक १३/०९/२०२३ चे ०९.३० वा. ते १७.३० वा. सुमारास पो.स्टे. काटोल हद्दीत यातील फिर्यादी हे मयतीवरून घरी परत आले असता त्याची अल्पवयीन मुलगी वय १५ वर्ष ११ महिने ही घरी दिसली नाही तिचा आजपावेतो आजुबाजुला नातेवाईक तसेच तिच्या मैत्रीणीकडे शोध घेतला असता मिळुन आली नाही. सदर फिर्यादीचे मुलीला कोणीतरी अज्ञात व्यक्तीने फिर्यादीचे कायदेशीर रखवालीतुन फुस लावुन पळवुन नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनी खोब्रागडे मॅडम मो. क्र. ८३०८०८२०९४ या करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**